# मनपाच्या इतिहासात प्रेरणादायी नोंद. गडकरी



**अंबाझरी येथे ऐतिहासिक विवेकानंद स्मारकाचे अनावरण**

महानगरपालिकेने अत्यंत कमी पैशात ऐतिहासिक अश्या 50 फूट उंच विवेकानंद स्मारकाचे निर्माण करून मनपाच्या इतिहासात प्रेरणादायी नोंद केल्याचे विधान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. रविवार ता. 1 जानेवारी 2017 रोजी अंबाझरी येथील भव्य अश्या स्वामी विवेकानंद पुतळ्याच्या अनावरण सोहळ्या प्रसंगी प्रमुख उदघाटक म्हणून ते बोलत होते.

याप्रसंगी मंचावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महापौर प्रवीण दटके, रामकृष्ण मठाचे अध्यक्ष स्वामी ब्रमस्थानांद, खा. अजय संचेती, खा. डॉ. विकास महात्मे, आ. सर्वश्री अनिल सोले, सुधाकर देशमुख, सुधाकर कोहळे, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, डॉ. मिलिंद माने, डॉ. परिणय फुके, उपमहापौर सतीश होले, स्थायी समिती अध्यक्ष बंडू राऊत, सत्ता पक्ष नेते दयाशंकर तिवारी, मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. याशिवाय बसपा पक्ष नेते गौतम पाटील, माजी मनपा आयुक्त श्याम वर्धने, स्थापत्य समिती सभापती सुनील अग्रवाल, जलप्रदाय समिती सभापती संदीप जोशी, कर आकारणी चे गिरीश देशमुख, धरमपेठ झोन सभापती वर्षा ठाकरे, मूर्तिकार राम सुतार, स्थायी समिती सभापती रमेश सिंगारे, परिवहन समितीचे सभापती बाल्या बोरकर, शिक्षण समितीचे सभापती गोपाल बोहरे, माजी महापौर अर्चना डेहनकर, अति. आयुक्त डॉ. रामनाथ सोनवणे, मुख्य अभियंता उल्लास देबडवार, नगरसेवक प्रकाश तोतवानी, सुप्रिया जाधव, सारिका नांदूरकर, आभा पांडे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

पुढे बोलताना गडकरी म्हणाले, की मनपाने केवळ हि भव्य प्रतिमाच उभारली नाही तर आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून स्मारकाखाली वातानुकूलित अशी स्वामीजींच्या जीवनावर आधारित एलईडी स्क्रीनवर 36 डिजिटल प्रेरक कथा सांगणारी चित्र- प्रदर्शनी देखील साकारली आहे, यासाठी सत्ता पक्ष नेते दयाशंकर तिवारी यांच्या कल्पकतेचे विशेष कौतुक गडकरी यांनी केले. ,यावेळी नागपुरातील सर्व शाळांच्या विध्यार्थ्यांना या स्मारक स्थळी भेट देण्याची व्यवस्था करण्यात यावी असे त्यांनी सुचवले. चांगल्या मार्गदर्शकाखाली स्वामीजींचे जीवन चरित्र देशाच्या भावी पिढीला कळविण्याचे आवाहन त्यांनी केले. यादवारे ' भविष्यातील भारताची प्रेरणा भविष्यातील पिढीला कळणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. हे स्मारक म्हणजे ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचे मूर्तिमंत स्वरूप असून मूल्यधिष्ठित जीवन पद्धतीची प्रेरणा यातून मिळत असल्याचे

विधान त्यांनी केले. या प्रसंगी मूर्ती साकारणारे पद्मभूषण राम सुतार यांचे विशेष कौतुक करीत त्यांनी साक्षात विवेकानंद साकारले असल्याचे गडकरी यांनी सांगितले. मनपा च्या इतिहासात हा संस्मरणीय सोहळा असून लवकरच अंबाझरी तलावात विवेकानंद यांच्या जीवनावरील लेझर शो सुरु होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी बोलताना मुख्ययमंत्री फडणवीस यांनी या स्मारकाला राष्ट्रीय स्मारक म्हणू शकतो एवढे सुंदर स्मारक मनपाने निर्माण केले असल्याचे सांगितले. 21 व्या शतकातील भारत कसा असावा याची प्रेरणा विवेकानंद यांच्या विचारातून मिळते. त्यांनी देशाच्या संस्कृतीला एक नवा विचार दिला असून जागतिक धर्म परिषदेत विश्व बंधुत्वाची संकल्पना मांडणारे ते पहिले तत्त्वचिंतक होते असे फडणवीस म्हणाले. जगाला शांतीचा संदेश देणारे विवेकानंद तरुणाईसाठी देखील प्रेरणादायी होते. देशभक्तीच्या तीन सोपाणाचे आकलन विवेकानंद यांच्या जीवनातून होत असून त्यांच्या मार्गावर चाल्यानेच या स्मारक निर्मितीचे खऱ्या अर्थाने सार्थक होईल असे विधान फडणवीस यांनी केले.

या प्रसंगी खा. अजय संचेती व डॉ. विकास महात्मे यांनी दोन करोड रु. चा निधी स्मारक स्थानातील कारंजे निर्मितीसाठी देण्याची घोषणा केली. प्रास्ताविक दयाशंकर तिवारी यांनी केले. सूत्र संचालन श्रद्धा भारद्वाज यांनी केले.

**पाच वर्षांची प्रतीक्षा संपली- महापौर**

ज्या कामाची नागपूरकरांना पाच वर्षांपासून प्रतीक्षा होती ती आज संपली आहे असे विधान महापौर प्रवीण दटके यांनी केले. पाच वर्षांपासून ज्या ऐतिहासिक वैभवाच्या उदघाटनाची प्रतीक्षा नागपूरकरांना होती त्या स्मारकासाठी अनेकांचे सहकार्य लाभले आहेत त्या सर्वांचे महापौर म्हणून आभार मानतो. स्वामी विवेकानंद यांनी वंचितांसाठी जो मार्ग दाखवला आहे त्याच मार्गावर मनपा सातत्याने चालण्याचा प्रयत्न करते आहे याकरिता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे चिंतन व मार्गदर्शन आम्हाला सतत लाभत असल्याचे विधान महापौर यांनी केले.

• • • • • • • • • • • • • • • •

# सिम्बॉयसिसची नोंद नागपूरच्या इतिहासात सुवर्ण अक्षरात. डॉ. मुजुमदार



**सिम्बॉयसिस विद्यापीठ कॅम्पसचे थाटात उद्घाटन**

महाराष्ट्राची उपराजधानी नागपुरात सिम्बॉयसिसची एक शाखा असावी असा संकल्प फार पूर्वीच केला होता. आज माझे वैयक्तिक स्वप्नं पूर्ण झाले. नागपूरच्या शैक्षणिक इतिहासात एक प्रगत दालन आज उघडले गेले असून आजचा दिवस नागपूरच्या इतिहासात एक प्रगत घटना तर सिम्बॉयसिसच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांची नोंद म्हणून नोंदविल्या जाईल असे उद्गार सिम्बॉयसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलपती डॉ. शां.ब. मुजुमदार यांनी काढले. ते शुक्रवारी वाठोडा येथे सिंबॉयोसीस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ पुणे संचालित नागपूर कॅम्पसच्या कोनशिला भूमीपूजनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी मंचावर मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर, सिंबॉयोसिसच्या प्रधान संचालिका विद्या येरवडेकर, कुलगुरु डॉ. रजनी गुप्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सिद्धार्थविनायक काणे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. मुजुमदार म्हणाले, की कोणत्याही प्राणिमात्रेला जिवंत राहण्यासाठी जशी प्राणवायूची गरज असते तशीच कोणत्याही देशाच्या विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज असते. जगात आपल्या देशाची प्रतिमा ही ‘ भारतातील माणसांना काम नाही व या देशात कामाची माणसे नाहीत ’ अशी आहे, ती प्रतिमा कौशल्य विकासाच्या शिक्षणाच्या माध्यमातून येत्या काळात पुसुन टाकण्याचे लक्ष्य सिम्बॉयसिसने स्वीकारले आहे.

कौशल्य म्हणजे हातोटी, कसोटी आणि सचोटी या तीन गोष्टींवर निर्भर असते. हे तिन्ही निकष हात, मन व मेंदूशी निगडीत आहे. सिम्बॉयसिस हे अश्या स्वरुपाचे ज्ञान, विज्ञान व तंत्रविज्ञानाचे मंदिर स्थापनेसाठी कटिबद्ध आहे. यावेळी बोलताना मुजुमदार म्हणाले की भारताच्या विद्यापीठांची तुलना जगातील नामांकित विद्यापीठांशी करणे चुकीचे आहे कारण त्यांना शतकांचा इतिहास लाभला आहे तर भारतीय विद्यापीठांना दशकांचा इतिहास आहे जो संपूर्णत: भारतीयकरणावर आधारित आहे याचा अभिमानच बाळगला पाहिजे. प्रास्ताविकेत विद्या येरवडेकर यांनी 75 एकर जागेमध्ये निर्माण होणार्या सिम्बॉयसिस विद्यापीठात 25 टक्के जागा स्थानिक विद्यार्थ्यांसाठी आरक्षित असून 15 टक्के फी सवलत असणार आहे अशी माहिती दिली. संचालन रेणुका देशकर यांनी केले. आभार डॉ. रजनी गुप्ते यांनी मानले.

**शैक्षणिक विकासात हातभार लागणार- श्रावण हर्डीकर**

सिम्बॉयसिस हे आंतरराष्ट्रीय पातळीवर शैक्षणिक क्षेत्रातील एक मानक ठरले आहे. हे विद्यापीठ नागपुरात आल्यामुळे नागपूरच्या शैक्षणिक विकासात हातभार लागणार आहे. मागील दीड वर्षांपासून सिम्बॉयसिस विद्यापीठ नागपुरात आणण्याची प्रक्रिया सुरु होती. विशेष म्हणजे हे आंतरराष्ट्रयी विद्यापीठ अशा जागेवर सुरु होत आहे जिथे 1976 पासून संपूर्ण शहराच्या सिवरेजसाठी वापर होत होता. सिम्बॉयसिस विद्यापीठाने या जागेचा मानकच बदलला. येथे बाजूलाच 140 एकरमध्ये स्पोर्ट सेंटर विकसित होत आहे. लगतच्या भांडेवाडी प्रकल्पाचा पूर्णत: कायापलट झाले असून येथे कचर्यापासून वीज निर्मिती प्रक्रिया सुरु झाली आहे, ही जागा आता विकासाचे मुलभूत केंद्र म्हणून विकसित होत आहे जे कोणत्याही स्मार्ट शहरासाठी आवश्यक आहे. या सर्व बाबी नागपूर शहराला आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर होण्यास मानक ठरणार असल्याचे विधान यावेळी हर्डीकर यांनी केले.

**आता नागपूरच्या विद्यार्थ्यांना मिळणार सिम्बॉयसिस शिक्षण- डॉ. काणे**

सिम्बॉयसिसची तुलना रातुम विद्यापीठाशी करणे चुकीचे आहे. रातुम विद्यापीठासोबतच आणखी एका दर्जेदार सिम्बॉयसिस शिक्षणाची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे असेच मी म्हणेल. सिम्बॉयसिस याचा अर्थ ग्रीक तत्वज्ञ ॲरिस्टॉटल यांनी उलगडला असून विविध वनस्पती ज्याप्रमाणे एकमेकांपासून चांगले ते घेतात व समन्वयातून विकसित होतात त्याप्रमाणेच एक विद्यापीठ असतना दुसर्या विद्यापीठाची गरज यासाठीच निर्मित होते.

**सुप्रिम 20 ची घोषणा**

याप्रंसगी डॉ. मुजुमदार यांनी सुप्रिम 20 ची घोषणा केली. या अंतर्गत वीस हुशार गरीब विद्यार्थ्यांना सिम्बायसिसतर्फे शिष्यवृत्ती, तंत्रज्ञान इ. चे प्रशिक्षण देऊन हे वीस विद्यार्थी जगभरात नागपूरची ओळख बनतील अशी घोषणा केली. आर्थिक मागासलेपणा म्हणजे र्निबुद्धपणा नसल्याचेही ते म्हणाले.

**आचारसंहितेमुळे मान्यवर सामान्य नागरिकांमध्ये**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे स्वप्न असलेले सिमबॉयसिस विद्यापीठ कॅम्पसचे शुक्रवारी वाठोडा येथे भूमिपूजन झाले मात्र याप्रसंगी आचारसंहितेमुळे गडकरी यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महापौर प्रवीण दटके, आ. प्रा. अनिल सोले, आ. सुधाकर कोहळे, आ. सुधाकर देशमुख. आ. कृष्णा खोपडे, आ. विकास कुंभारे, आ. डॉ. मिलिंद माने, उपमहापौर सतीश होले, स्थायी समिती सभापती सुधीर (बंडू) राऊत.

• • • • • • • • • • • • • • • •

# देशातील पहिला सांडपाणी पुनःचक्रीकरण प्रकल्प ठरणार वरदान



**नागपूर महानगरपालिकेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहावा असा देशातील पहिला 130 एमएलडी क्षमता असलेला**

नागपूर महानगरपालिकेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहावा असा देशातील पहिला 130 एमएलडी क्षमता असलेला भांडेवाडी येथील सांडपाणी पुनःचक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्प नागपूरकरांसाठी वरदान ठरणार आहे. या प्रकल्पामुळे शुद्ध पाण्याची बचत झाली असून 9 लाख लोकांना पुरेल एवढे पाणी उपलब्ध झाले आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी याचा फायदा होणार आहे. नागनदीच्या पाण्याचे प्रदूषण कमी करून शुद्ध पाण्याची बचत याद्वारे होणार आहे. आगामी काळात सर्व राज्यात वीज प्रकल्प व औद्योगिक क्षेत्रात या 'नागपूर पॅटर्न'चा सर्वत्र वापर होणार आहे.

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण योजनेअंतर्गत महानगरपालिका व महानर्मिती यांच्या संयुक्त सहभागातून १९५ कोटींचा हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पातील पाणी महानिर्मितीच्या कोराडी येथील वीज प्रकल्पाकरिता वापरण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे वैनगंगा नदीचे प्रदूषण कमी होण्यास मदत मिळणार आहे. या प्रकल्पामुळे नागपूर महानगरपालिकेला सांडपाण्यापोठी महानिर्मितीकडून दरवर्षी 15 कोटी रुपये मिळणार आहे. 'स्मार्ट नागपूर'च्या दिशेने महापालिकेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे.

• • • • • • • • • • • • • • • •

# नागपूर बनतंय स्मार्ट



**स्मार्ट शहराच्या दिशेने पाऊल टाकणारे नागपूर हे देशातील पहिले शहर ठरले आहे**

स्मार्ट शहराच्या दिशेने पाऊल टाकणारे नागपूर हे देशातील पहिले शहर ठरले आहे. दहा चौकांमध्ये सीसीटिव्ही कॅमेरे आणि फ्री-वायफाय सुविधा कार्यान्वित झाल्यानंतर मार्चपर्यंत जपानी गार्डन ते ऑरेंज सिटी हॉस्पीटल चौक हा रस्ता 'गोल्डन स्ट्रीट' म्हणून स्मार्ट नागपूरचे मॉडेल म्हणून ओळखला जाईल. यापुढे ज्या-ज्या शहरांची स्मार्ट सिटी म्हणून निवड होणार आहे त्या शहरांसाठी नागपूर हे मॉडेल ठरेल. या प्रकल्पांतर्गत नागपूर शहरात ४००० सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात येतील.

इंटीग्रेट ट्राफिक सिस्टीम'ची सर्वप्रथम अंमलबजावणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महापौर प्रवीण दटके, आयुक्त श्रावण हर्डीकर आणि नागपूरकरांच्या पुढाकाराने नागपुरात झाली. आता जो वाहतुकीचा नियम तोडेल, त्याचा पुरावा यंत्रणेकडे राहणार आहे. सध्या अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. या अपघातांवर सदर यंत्रणेच्या माध्यमातून नियंत्रण करण्यात येईल. नियोजित गोल्डन स्ट्रीट ३१ मार्च २०१७ पर्यंत पूर्णपणे वायफाय युक्त होईल. भविष्यात संपूर्ण नागपुरात वायफाय सुविधा उपलब्ध करण्यात येईल.

स्मार्टसिटीअंतर्गत नागपूर शहर जागतिक नकाशावर झळकणार आहे. यासाठी नागपूरच्या ब्रँडीगसाठी नागपूरचा विशेष लोगो तयार करण्यात आला आहे. जगाच्या पाठीवर न्यूयॉर्क, मेलबोर्न आणि नंतर या शहराचा विशेष लोगो तयार करण्यात आलेला आहे.

• • • • • • • • • • • • • • • •

# महानगरपालिका करतेय भंगारातून कलाकृतीची निर्मिती



**भंगार साहित्यातून कलाकृती साकारणारा उपक्रम**

स्वच्छ नागपूर, हिरवे नागपूर-सुंदर नागपूर करण्यासाठी आधी भिंती रंगविण्याचा 'ग्राफिटी' उपक्रम राबविणाऱ्या नागपूर महानगरपालिकेने आता एक आणखी अभियान हाती घेतले आहे. भंगार साहित्यातून कलाकृती साकारणारा उपक्रम मनपाने हाती घेतला असून, देशातील नामांकित कलावंताना आमंत्रित करण्यात आले आहेत.

बैद्यनाथ चौकातील ग्रेट नाग रोडवर असलेल्या मनपाच्या वर्कशॉपमध्ये लोखंडी भंगार साहित्यातून एकापेक्षा एक सरस व नवीन कलाकृतींची निर्मिती करण्यात आली आहे. 'कचऱ्यातून कला' या विषयांतर्गत हा अभिनव उपक्रम आकर्षक ठरेल.

महानगरपालिकेकडे जुन्या लोखंडी टाकावू वस्तू मोठ्या प्रमाणावर पडून आहेत. या भंगारातून कलाकारांनी आपल्या कलेतून विविध कलाकृती निर्माण केल्या आहेत. मनपाच्या घाट रोडवरील वर्कशॉपमध्ये १४ कलाकार राबत आहेत. बडोदा, मुंबई, हैद्राबाद, नाशिक, नागपूर येथील कलाकार कलेचा अविष्कार साकारत आहेत. झिरो माईल, ऑरेंज सिटी, टायगर कॅपिटल, शहरी जीवनातील विश्रांतीचे क्षण, 'फादर ॲण्ड गर्ल चाईल्ड' आणि मारबतसारख्या कलाकृती निर्माण केल्या जात आहे. शहरात विविध ठिकाणी या वस्तू ठेवून परिसराच्या सौंदर्यीकरणात भर पडणार आहे. अशाप्रकारच्या कलाकृती निर्माण करणारी नागपूर महानगर पालिका पहिली ठरणार आहे.

• • • • • • • • • • • • • • • •

# रेड आणि व्हाईट. झेब्रा क्रॉसींगचा राजा.राणी चौक



**सिव्हील लाईन्स येथील राजा-राणी चौकात अभिनव पद्धतीने ‘झेब्रा क्रॉसींग’ करण्यात आली**

नागपूर महानगरपालिकेच्या वाहतूक विभागातर्फे सातत्याने नागरिकांच्या सोयीस्कर आणि सुरक्षित वाहतूक प्रवासासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. नुकतेच सिव्हील लाईन्स येथील राजा-राणी चौकात अभिनव पद्धतीने ‘झेब्रा क्रॉसींग’ करण्यात आली आहे. पाहताक्षणी लक्ष जाईल असे हे काम आहे. ‘रेड आणि व्हाईट’ क्रासिंग पादचारी मार्ग सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

वाहतुकीच्या आयआरसी निकषानुसार लाल रंगदेखिल वापरता येत असल्याने या ठिकाणी मुद्दाम प्रायोगिक तत्वावर हा लाल रंग वापरण्यात आला. वाहतूक विभागातर्फे पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देणारे, सायकल चालविणाऱ्यांसाठी अभिनव उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत विविध चौकात रस्त्याच्या डाव्या आणि उजव्या, अशा दोन्ही बाजूंनी वेगळा मार्ग त्यांच्यासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. भोले पेट्रोल पंप चौकात दीड फूट उंचीचा रस्ता पादचाऱ्यांसाठी खूप अडचणीचा ठरत होता. त्याचे समतोलीकरण करुन या चौकाच्या सौंदर्यात वनराई संस्थेच्या सहकार्याने भर घालण्यात आली. अनेक चौकातील पादचारी मार्ग दिव्यांग लोकांसाठी त्रासदायक ठरत होते ते सर्व मार्ग सोयीस्कर करण्यात आले.

अजनी चौक हा अपघाताचा चौक म्हणूनच ओळखल्या जात असे. रात्रीच्या अंधारात रस्ता दुभाजकांवर वाहने आदळून अनेक अपघात होत असे. या ठिकाणी दोन्ही बाजूला दिशादर्शक फलक, सोलर कॅटआईस व फ्लेक्सीबल मार्कर, मीडियम मार्कर लावण्यात आले आहेत. रात्रीच्या अंधारात हे ठळकपणे चमकत असल्यामुळे या ठिकाणी अपघाताचे प्रमाण पूर्णपणे कमी झाले. जापानी गार्डन ते ऑरेंज सिटी हॉस्पीटल या मार्गावर लवकरच सायकल ट्रॅक होणार असून या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे.

• • • • • • • • • • • • • • • •

# राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त आयुक्तांनी दिली शपथ



**राष्ट्रीय मतदारदिवसानिमित्त मनपाच्या मुख्यालयात महानगरपालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी समस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना शपथ प्रदान केली.**

राष्ट्रीय मतदारदिवसानिमित्त मनपाच्या मुख्यालयात महानगरपालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी समस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना शपथ प्रदान केली. १८ वर्ष पूर्ण केलेल्या नवीन तरुण मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व मतदान प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढवणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

राष्ट्रीय मतदार दिवसाच्या अनुषंगाने शासनाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा लोकशाही प्रक्रियेमधील सहभाग वाढावा या हेतूने मनपा मुख्यालयातील नवीन प्रशासकीय इमारतीच्या लॉबीमध्ये मतदानासाठीची शपथ घेण्यात आली.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त डॉ. एस.झेड. सिद्दीकी, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, उपायुक्त रवींद्र देवतळे, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, सहायक आयुक्त (सामान्य प्रशासन) महेश धमेचा,सहाय्यक आयुक्त मिलिंद मेश्राम, कार्यकारी अभियंता संजय जैस्वाल, सहायक संचालक (नगर रचना) सुप्रिया थूल, कार्यकारी अभियंता सतिश नेरळ, प्रमुख अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, नागरी सुविधा केंद्र प्रमुख आर.एस.कांबळे, म.न.पा. अधिक्षक फा.गो. उके,अधिक्षक विलास फडणवीस, सहा. अधिक्षक सुरेंद्र मुरकुटे, राजन काळे, म.न.पा. कर्मचारी संघाचे राजेश हाथीबेड, सहा.जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डनवीस, डॉ. अशोक उरकूडे तसेच मनपाचे समस्त अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर यांनी केले.

• • • • • • • • • • • • • • • •

# मनपा मुख्यालयात महापौर आणि आयुक्त यांच्या हस्ते ध्वजारोहन सोहळा संपन्न



**जयोस्तूतें - च्या मंगलमयी सुरांनी निनादला परिसर**

26 जानेवारी हा देशाचा गणतंत्र दिवस महानगर पालिका मुख्यालयाच्या परिसरात सकाळी 8 वाजता उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महापौर प्रवीण दटके व मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. प्रारंभी मनपाच्या अग्निशमन विभागाच्या दोन प्लाटूनतर्फे महापौर प्रवीण दटके व आयुक्त श्रावण हर्डीकर यांना मानवंदना प्रदान करण्यात आली.

लकडगंज झोनच्या अग्निशमन केंद्राचे प्रमुख मोहन गुडधे तसेच कळमना झोनच्या अग्निशमन केंद्राचे प्रमुख चंद्रकांत तिवारी यांनी या दोन प्लाटूनचे नेतृत्व केले. अग्निशमन विभागाचे प्रमुख राजेंद्र उचके यांच्या नेतृत्वात अत्यंत सुमधुर मानवंदना यावेळी मान्यवरांना प्रदान करण्यात आली. देशभक्तीपर सुरांच्या निनादातच मान्यवरांना ध्वजारोहन ठिकाणी नेण्यात आले.

जयोस्तुते..., ए मेरे वतन के लोगो.., यासारख्या देशभक्तीपर गीतांनी संपूर्ण वातावरण भारावले होते. ध्वजारोहण नंतर राष्ट्रगीत सादर झाले. यानंतर मान्यवरांचा सत्कार प्रशासकीय अधिकारी यांच्या हस्ते पार पडला. यावेळी महापौर प्रवीण दटके यांनी समस्त अधिकारी व कर्मचारी वर्गाला गणतंत्र दिवसाच्या शुभेच्छा प्रदान केल्या.

यावेळी मंचावर अतिरिक्त आयुक्त डॉ. रामनाथ सोनवणे, अतिरिक्त आयुक्त आर. झेड. सिद्दीकी, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, उपायुक्त रवींद्र देवतळे, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला मनपाचे समस्त अधिकारी व कर्मचारी वर्ग यांची उपस्थिती होती. संचालन सहायक आयुक्त महेश मोरोणे यांनी केले.

यावेळी मनपाच्या शिक्षण विभागाच्या वतीने गणतंत्र दिनानिमित्त, कस्तुरचंद पार्क येथे चित्ररथ सहभागी झाले, सर्व शिक्षण अभियान इत्यादी संदेश देणाऱ्या या चित्ररथाचे उदघाटन महापौर प्रवीण दटके व आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते पार पडले.

• • • • • • • • • • • • • • • •